महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने साजरे करण्यात आलेल्या नियमित कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे :

१. **२१ जून २०२१** रोजी ४ था आंतराष्ट्रीय योग्य दिन महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शाररिक शिक्षण विभागाचे प्राध्यापक डॉ. नितेश राऊत सर यांनी आभासी पद्धतीने योग्य प्रात्यक्षिक व प्राणायम याचा सराव घेतला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थी सहभागी झाले.

२. **०१ जुलै २०२१** महाराष्ट्र शासनाने 'हरित महाराष्ट्राची' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन व जनतेच्या सहभागातून सन २०२१ रोजी या वर्षात 'वन महोत्सव' या कालावधीत महाविद्यालयामध्ये २० वृक्षांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन पर्यावरणासाठी किती आवश्यक आहे याची माहिती प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना दिली.

३. **स्वतंत्र दिन :** १५ ऑगस्ट २०२१ हा भारतीय स्वतंत्र दिन महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. जीवनपाटील कापसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्त महाविद्यालयामध्ये देशभक्तीपर गीतगायनाचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये रासेयो सहकार्यक्रमाधिकारी प्रा. विजय भगत व रासेयो विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

४. **शिक्षक दिन** : ०५ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'आजचा विद्यार्थी व शिक्षक : आव्हाने' याविषयी प्रा. डॉ. गजानन सोडणर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५. **२४ सप्टेंबर २०२१** : राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून यादिवशी रासेयो विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये ६७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. श्रमदानानंतर विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला. यावेळी कोरोनाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले.

६. **०२ आक्टोबर २०२१** : या रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी मा. पंतप्रधान यांनी सूचित केल्याप्रमाणे "स्वच्छ भारत अभियान'" अंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

७. **१५ आक्टोबर २०२१ ( वाचन प्रेरणा दिन)** : या रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. याप्रसंगी उपस्थित प्रा. डॉ. कुलकर्णी सरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले व उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

८. **२६ जानेवारी २०२२** : प्रजासत्ताक दिनानिमित्य महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. जीवनपाटील कापसे यांच्या हस्ते सकाळी ०८:०० वाजता ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा. भगत सर व स्वयंसेवकांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. सोबत विद्यार्थ्यांना नास्ता व चहा देण्यात आला.




माजी वसुंधरा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती दिं २८/१२/२१.

इ-प्रतिज्ञा मध्ये एकूण ६१ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.




दिं. ०२/१२/२०२१ रोजी महाविद्यालयात आरोग्य मार्गदर्शन व हिमोग्लोबिन तपासणी शिबीर राबविले.



दिं. १५/०१/२२ रोजी कौशल्यविषयक कार्यशाळा राबविण्यात आली.




दिं. १९/०१/२०२२ रोजी वित्तीय साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली.




ठिकाण : चपराळा व मार्कंडा, दि. २८ मार्च २०२२

दिं. २८/०३/२०२२ रोजी रासेयो चा पर्यावरण अभ्यास दौरा पार पडला.

!! विद्या परं दैवतम !!

# S.P.M.Tatyasaheb Mahajan Arts & Commerce College,

CHIKHLI, Dist.Buldana - 443 201 (M.S.)

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

Organised by Dept. of N.S.S.

## Certificate

This is to certify that, **Achal Pravin Kinhekar** has participated in One Day Online State Level Elocution Competition held on 25th January , 2022 Organised by Dept. of N.S.S. S.P.M.T.M. Arts & Commerce College, Chikhli. Dist. Buldana.

We wish him/her all the best for future & expect co-operation for the college

[ Prof. Vijay R.Wakode ] [ Dr.S.G. Raut ]
Co - ordinator N. S. S

Chikhli

[ Dr. Subhash. D. Gawhane ]
Principal

Made for free with Certify'em

कु. अचल किन्हेकर हिने मतदार दिनानिमित्य राज्यस्तरीय भाषण स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला.

# एसपीएम महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस

## राज्यस्तरीय ई- वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

चिखली, ता. २५ : येथील एसपीएम तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिवस पार पडला. या दिवसाच्या निमित्ताने वैभव खाडे, नायब तहसीलदार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी तरुणांनी मतदार म्हणून नोंदणी करावी व मतदान करून राष्ट्रीय उत्सवात सहभागी होऊन लोकशाही बळकट करावी म्हणजे देश विकसित होईल असे प्रतिपादन केले.

यानिमित्त राज्यस्तरीय ई-वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत मी मताधिकार बजावतो/बजावते कारण मताधिकार परिवर्तनाचा राजमार्ग त्यात महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच विद्यापीठाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. एस.एन.डी.टी विद्यापीठ,मुंबई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती, शिवाजी महाराज विद्यापीठ,कोल्हापूर, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव इ.विद्यापीठातून विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक - लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,राहुरी,अहमदनगर ची विद्यार्थिनी कु.निकिता धर्मेंद्र शिंदे हिचा, द्वितीय क्रमांक विभागून नूतन महाविद्यालय,लासलगाव, जि.नाशिक ची विद्यार्थिनी कू.अश्विनी कवडे व कला व वाणिज्य महाविद्यालय, कारेगाव जि. यवमाळम ची विद्यार्थिनी आचल प्रवीण किन्हेकर. तर तृतीय क्रमांक वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय,मुरुड जंजि जी.रायगड ची विद्यार्थिनी हुसै अक्सा असीम हिला प्राप्त झाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभ गव्हाणे यांनी पारितोषिक विजेत्यांची नावे घोषित करून त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ.सुभाष जी. राऊत यांनी केले.

4G H 8:43 AM

Akash Kumare
February 1, 8:22 AM

दैनिक **यवतमाळ डंका**

संपादक - प्रवीण रापतीवार

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन

**मारेगाव। ३१ जानेवारी प्रतिनिधी :** स्थानिक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिं २५ जाने २०२२ ला मतदार दिनानिमित्त भाषण व ई -घोषवाक्य कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये कु. आचल किन्हेकार, तेजस्वी वांढरे व शुभांगी मुंघाटे आदींनी मी मताधिकार बजावतो या विषयावर भाषण दिले तसेच इतर रासेयो विद्यार्थ्यांकडून ई - घोषवाक्य लिहून घेऊन समाजामध्ये मतदानाची जनजागृती व्हावी हाच एक उद्देश प्रत्येकानी मनाशी बाळगला. प्रसंगी रासेयो विद्यार्थिनी कु. आचल प्रवीण किन्हेकार हिने स्करूमहाविद्यालय, चिखली द्वारे मतदान दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय भाषण स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविले या विद्यार्थिनीचे प्राचार्य डॉ. अविनाश घरडे सरांनी अभिनंदन केले. उपक्रमाच्या यशस्वीतेकारिता रासेयो कार्यक्रम अधिकारी बाळासाहेब देशमुख व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. भगत सर आणि शेंडे मॅडम यांनी पुढाकार घेतला.